महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:डीआरए-०५२२/प्र.क्र.८८/२०२२/जाहिरात दिनांक: ११ मे, २०२२

**-: शुध्दिपत्र :-**

**विषय: वैज्ञानिक अधिकारी (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण), गट-ब या संवर्गाच्या अर्हतेबाबत**

**संदर्भ: जाहिरात क्रमांक-०३७/२०२२**

वैज्ञानिक अधिकारी (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण), गट-ब या संवर्गातील पद भरतीकरीता दिनांक १४ एप्रिल, २०२२ रोजी प्रसिध्द जाहिरातीमध्ये विद्यमान सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार शैक्षणिक अर्हता नमूद करण्यात आली आहे. तसेच, शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: संकिर्ण-२०१३/(४५/१३)/भाग-१/तां.शि.-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ अन्वये विहित शैक्षणिक अर्हता समकक्ष अर्हता म्हणून ग्राह्य समजण्यात येतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

२. Master in Computer Application या शैक्षणिक अर्हतेच्या समकक्षतेबाबत आयोगाकडून करण्यात आलेल्या विचारणेस अनुसरुन सदर अर्हता प्रस्तुत संवर्गाकरीता समकक्ष म्हणून ग्राह्य धरण्याबाबत, शासनाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्यात यावेत, असे शासनाकडून शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एफएसएल-०४२१/प्र.क्र.२३४/पोल-४, दिनांक ९ मे, २०२२ नुसार अन्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार Master in Computer Application ही शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमदेवारांचे अर्ज स्वीकारण्याकरीता अर्हताधारक उमेदवारांना शासनाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून खालीलप्रमाणे अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे:-

**२.१ ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक १४ मे, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**२.२ ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याकरीता विहित अंतिम दिनांक १४ मे, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**२.३ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक १६ मे, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**२.४ चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक १७ मे, २०२२ - बँकेच्या कार्यालयीन वेळेत.**

**३. जाहिरात क्रमांक ०३७/२०२२ मधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.**

४. सदर शुध्दिपत्र तसेच मूळ जाहिरात क्रमांक ०३७/२०२२ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण : मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.